जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणातही आम्ही भारी





**कोल्हापूर... नावापासून वेगळे वाघापूर, सिंहापूर, लांडगापूर नाही; पण कोल्हापूर आहे. भाषातज्ज्ञांच्या मते, पूर्वी हे कलापूर पुढे अपभ्रंशित होत कोल्हापूर झाले; मात्र हे पटत नाही, कारण कोल्हासुर नावाच्या राक्षसाचा वध या भागात झाला. कोल्हासुराने मरणापूर्वी हे गाव आपल्या नावावरून ओळखले जावे, अशी इच्छा व्यक्त केली आणि त्यानुसार कोल्हापूर हे नाव आले. त्यापूर्वी हे शहर करवीर होते. आजही तालुक्याचे नाव करवीर असेच आहे. नावापासून सुरू झालेले वेगळेपण कोल्हापूर प्रत्येक गोष्टीत जपत आहे.**



डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कोल्हापूर म्हटले की डोळ्यांसमोर येतो... कोल्हापुरी साज, कोल्हापुरी गूळ, कोल्हापूरची तालीम संस्कृती, कट्ट्यावरचे निरसे दूध, तांबडा-पांढरा रस्सा, कोल्हापुरी मिसळ, कोल्हापुरी चप्पल, रंकाळा, जोतिबा, अंबाबाई, नृसिंहवाडीसारखी तीर्थक्षेत्रे, पन्हाळा, विशाळगड, यासह १३ किल्ले, गोव्याचा रस्ता कोल्हापुरातून, लावणी, तमाशा, चित्रपट अशा कलांची ही भूमी, पाच नद्या व पंचगंगा, एकीकडे सह्याद्री पाठ राखतो व पूर्वेकडे सपाट भाग. सह्याद्रीमध्ये अफाट जैवविविधता, उसाचे भरपूर उत्पादन करून मनात गोडवा जपणारी, प्रेम आले तर डोक्यावर घेणारी आणि आडवे आले तर आडवेच करणारी रांगडी माणसे, प्रत्येक गोष्टीत स्वतःचा ब्रँड असणारे कोल्हापूर जगात भारी. इतिहासात जी-जी गोष्ट महत्त्वाची असायची, त्या प्रत्येक गोष्टीवर कोल्हापूरची छाप होती आणि आजही अनेक गोष्टींत आहे. हे वेगळेपण कोल्हापूरने शिक्षणातही जपले आहे, जपत आहे. आणि म्हणूनच शिक्षणातही कोल्हापुरी... ठरत आहे लय भारी.



शिक्षण मानवाला परिपूर्ण होण्यासाठी, माणसाला माणूसपण देणारे एक उपयुक्त साधन आहे. ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि समाजामध्ये एक सुज्ञ नागरिक म्हणून आवश्यक सवयी देण्याची शिक्षण, एक प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे विचार करणे आणि कार्य करण्याच्या क्षमतेवर सकारात्मक परिणाम होतो. व्यक्तीला स्वतःचे हक्क समजतात, तसेच कर्तव्याचीही जाणीव होते. आजचे शिक्षण शाळा-महाविद्यालये आणि विद्यापीठातून औपचारिक पद्धतीने आणि दैनंदिन जीवनातील अनुभवाद्वारे अनौपचारिक पद्धतीने मिळते. यातून स्वतःचा आणि राष्ट्राचाही आर्थिक विकास साधण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान शिक्षणातून प्राप्त होते. शिक्षणातून जबाबदार नागरिक घडण्याची प्रक्रिया होत असते.

कोल्हापूर आणि हा भूभाग शिक्षणातही प्रगत होता आणि आहे. आज शालेय स्तरापासून, संशोधन स्तरावरील कार्यातून ही ओळख कायम ठेवून आहे. तसे कोल्हापूर प्राचीन काळातही शिक्षणासाठी प्रसिद्ध होते. जैन आणि बौद्ध धर्मांच्या पाठशाळा या भागात होत्या. मध्ययुगात शंकराचार्यांनी येथे शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली होती, असे सांगण्यात येते; मात्र नव्या शिक्षण पद्धतीमध्ये या भागातील नेतृत्वाने दिलेल्या योगदानातून ही ओळख निर्माण झाली आहे.

कोल्हापुरात शिक्षण रुजवण्यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न झाले. कोल्हापूरचे राजे छत्रपती शिवाजी (तिसरे) (१८३७ ते १८६६) यांनी सर्वप्रथम कोल्हापूर संस्थानात सरकारी खर्चाने शाळा सुरू केल्या. १८५१ मध्ये त्यांनी पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापन झाली. त्याचबरोबर पन्हाळा, कागल, आळते, मलकापूर, बावडा, शिरोळ, गडहिंग्लज, भुदरगड येथील राजवाडे शाळा सुरू करण्यासाठी देण्यात आले. या भागात १८५३ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू झाली. छत्रपती राजाराम महाराज (१८६६ ते १८७०) यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या. कोल्हापुरात १८६७ मध्ये पहिली माध्यमिक शाळा सुरू झाली. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होतील, याकडे तत्कालीन राज्यकर्त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यातूनच उच्च शिक्षणासाठी राजाराम महाविद्यालय १८८० मध्ये स्थापन झाले. सुरुवातीला हे महाविद्यालय भवानी मंडप येथील राजवाड्यात भरत असे. राजाराम महाविद्यालयात ... शिक्षणाची सुविधा ... मध्ये उपलब्ध ... या महाविद्यालयात ...साठी भारतभरातून विद्यार्थी येत. राजाराम महाविद्यालय हे महाराष्ट्रातील एक उत्तम महाविद्यालय म्हणून ओळखले जाऊ लागले; मात्र ते गोरगरिबांच्या दारात नेण्याचे आणि कोल्हापूरची शिक्षणासाठी ओळख निर्माण करण्याचे कार्य केले ते राजर्षी शाहू महाराज यांनी.

समाजाला नेमकी कशाची गरज आहे, हे ओळखणारे राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूरमध्ये शिक्षणाची दारे सर्वांना खुली केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. महात्मा जोतिराव फुले यांच्यानंतर भारतात शिक्षणाचे मोल खऱ्या अर्थाने कोणी जाणले होते ते राजर्षी शाहू महाराज यांनी. त्यांनी आपल्या राज्यात ▸▸ पान ६ वर..

A Jain Enterprise

With Best Compliments

Gnat Foundry Pvt. Ltd.

Gnat Engineering
(Machine Shop Division)

AVALON POWER PVT. LTD.
Mfrs.- Hydrogen Generation equipment, PSA Oxygen Plants & (Urmodi Hydro Electric Power)
4/1, M.I.D.C. SHIROLI, Kolhapur. 416 122

07 MAR 2026

पुण्यनगरी



# सृष्टी कुलकर्णीची बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णी बी.बी.ए भाग-३ हिने सिल्व्हर मेडल प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये आपले स्थान निश्चित करून पुढील स्पर्धेकरिता ती पात्र ठरली. यशाबद्दल सृष्टी कुलकर्णी हिला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
07 MAR 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघ उपविजेता

**कोल्हापूर** : महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकूण १७ विद्यापीठ संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील तीन साखळी सामन्यांत अनुक्रमे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर या संघांचा पराभव करून शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने उपांत्य फेरीत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा पराभव केला होता.

यावेळी खेळाडू व्ही.बी. कोंढावळे, एस. जे. दाभाडे, आर. एम. कोळी, व्ही. बी. शिंदे, ए. यू. कोठावळे, आर. जी. ढोणुक्षे, ए. एस. पाटील, व्ही. जे. हिलगे, व्ही. व्ही. भोसले, वाय. डी. दळवी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 7 MAR 2026
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : महाराष्ट्र राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी–२० क्रिकेट स्पर्धेचे उपविजेतेपद मिळालेल्या शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाचा प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित कुलसचिव डॉ. विलास शिंदे व क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे.

# विद्यापीठ कर्मचारी संघ उपविजेता

## राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी–२० क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम सामन्यापर्यंत मुसंडी मारलेल्या शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाला अखेर उपविजेतेपद मिळाले. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाने शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाला ६ गडी राखून हरवत विजेतेपद पटकावले.

सोलापुरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मैदानात ही स्पर्धा झाली. एक महिना सुरू झालेल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील १७ विद्यापीठ संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल्या शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाने साखळी फेरीतील सामन्यांमध्ये जळगावातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिकमधील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व नागपुरातील महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ संघाचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघ व नाशिकमधील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यात उपांत्य

### ■ सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ संघाने पटकावले जेतेपद

सामना झाला. यात प्रथम फलंदाजी आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ बाद १५७ ठोकल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ संघाने १९.५ षटकात ८ बाद १५८ करत सामना जिंकला. सामन्याच्या अखेरच्या षटकात अनिल साळोखे यांनी चौकार मारुन शिवाजी विद्यापीठ संघाचा सामन्यातील विजय सोपा केला होता.


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ संघ यांच्यात अंतिम लढत झाली. यात प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने २० षटकांत ४ बाद १४३ केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना फुले विद्यापीठाने १८.२ षटकात ६ बाद १४७ धावा करुन सामन्यात विजय मिळवत स्पर्धेच्या विजेतेपदावर कब्जा केला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. शिवाजी विद्यापीठ संघाला स्पर्धेतील सामने जिंकून देण्यासाठी विक्रम कोंडावळे, अनिल साळोखे, अनिल पाटील, विनायक शिंदे, विशाल हिलगे, अभिजीत कोठावळे, रमेश ढोणुक्षे व योगेश दळवी यांनी उत्कृष्ट खेळ केला. बक्षीस वितरण समारंभात स्पर्धा विजेता फुले विद्यापीठ व उपविजेता शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघाला चषक देऊन गौरवले.

स्पर्धेहून कोल्हापूरात परतल्यानंतर शिवाजी विद्यापीठ संघाचा प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठातील क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी डॉ. जाधव व डॉ. शिंदे यांना स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठ संघाची यशस्वी कामगिरीची माहिती सांगितली.

### उपविजेता शिवाजी विद्यापीठ कर्मचारी क्रिकेट संघ

विक्रम कोंढावळे (कर्णधार), शशिकांत दाभाडे (उपकर्णधार), विनायक शिंदे, अभिजीत कोठावळे, रमेश ढोणुक्षे, अनिल पाटील, विशाल हिलगे, विशांत भोसले, योगेश दळवी, राजेश्वर मुपडे, युवराज साबळे, सुरेश वागवेकर, अनिल साळोखे, हरिष मस्के. प्रशिक्षक-राजेश कोळी.

जनसंपर्क कक्ष
07 MAR 2026 सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कडक कवचाच्या आत एक कोमल हृदय असतं आणि त्या हृदयात फक्त आपल्या पिलासाठी माया असते. केवळ व्हिटॅमिन 'डी'साठी नाही, तर आईच्या छत्रछायेखाली जगण्याचे संस्कार शिकण्यासाठी हे पिलू उन्हात विसावलंय. आईच्या सोबतीने घेतलेला हा 'सनबाथ' कोणत्याही सुखापेक्षा कमी नाही. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत शास्त्र विभागाजवळील तलावात घेतलेले छायाचित्र.

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

0 7 MAR 2026

सकाळ

# 'समाजकार्य'च्या विद्यार्थ्यांची सेवाभावी संस्थांना भेट

कोल्हापूर, ता. ६ : समाजकार्याच्या अभ्यासामध्ये सैद्धांतिकतेबरोबरच प्रत्यक्ष कार्यानुभवा करीता शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी कर्नाटक, तमिळनाडूतील काही सामाजिक, सेवाभावी संस्थांना भेट दिली.

कर्नाटकातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसायन्सेस (बंगळूर), ओॲसिस इंडिया, कॅडबॅम्स हॉस्पिटल, अक्षयपात्रा फाउंडेशन, स्टंप शूल अँड सोमप्पा स्प्रिंग्ज (बंगळूर), राणे ग्रुप (मैसुरू), आदिवासी संशोधन केंद्र, रुग्णालये, उद्योग समूह आणि स्थानिक सेवाभावी संस्थांना भेटी देऊन तेथील सोयीसुविधांची माहिती घेतली. या अभ्यास सहलीत ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समन्वयक डॉ. उमेश गडेकर, डॉ. ऊर्मिला दशवंत आणि सौरभ धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल झाली. कॅडबॅम्स हॉस्पिटलमध्ये व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि दीर्घकालीन पुनर्वसन प्रक्रियेबाबत जाणून घेतले. बंगळूरमधील अक्षयपात्रा फाउंडेशन येथे विद्यार्थ्यांनी शालेय माध्यान्ह भोजन योजनेच्या अंमलबजावणीतील स्वयंपाकगृह, गुणवत्ता नियंत्रण आणि वितरण व्यवस्थापन प्रणालीचा अभ्यास केला.

0 7 MAR 2026

लोकमत

# नेसरीत आज समाजशास्त्र परिषद व राष्ट्रीय चर्चासत्र

**नेसरी** : येथील भाई तुकाराम कोलेकर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठातर्फे आज (शनिवार) समाजशास्त्र परिषदेची १७ वी परिषद होत आहे. परिषदेमार्फत राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत डॉ. रमेश मांगलेकर यांचे बीजभाषण होणार असून समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा देसाई यांची प्रमुख उपस्थिती रहणार आहे. परिषदेने जीवनगौरव पुरस्कार प्रा. परिसा घोंगडे व प्रा. अश्विनी मारुलकर यांना जाहीर केले आहे. परिषदेत कोल्हापूर, सांगली, सातारा, जिल्ह्यांतील समाजशास्त्राचे प्राध्यापक व संशोधक उपस्थित राहणार आहेत अशी माहिती प्रा. डॉ. सतीश देसाई यांनी दिली.

0 7 MAR 2026

नवराष्ट्र

Paschim Maharashtra | 07 March 2026 | Page 1

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ग्रंथालयांचे महत्त्व टिकून : प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे राष्ट्रीय परिषदेमध्ये प्रतिपादन

# एआयच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित

कोल्हापूर (श.प्र.) कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झंझावातामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांनी केले. महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकगा



संघटनेचे अध्यक्ष डॉ.मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ.विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते.

प्र-कुलगुरू डॉ.जाधव यांनी व्यक्तीगत आयुष्यातील काही उदाहरणे देत ग्रंथालयांचे महत्त्व आपल्या भाषणात विषद केले. त्या म्हणाल्या, ग्रंथालये ही ज्ञानाचे वाहक आणि प्रज्ञेचे निर्माते आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही या मूळ स्रोतांचे महत्त्व अबाधित राहणार आहे.

### ग्रंथालयांचा चौफेर विकास हेच उद्दिष्ट घेऊन कार्यरत असल्याचे स्पष्ट

डॉ. एस.ए.एन. इनामदार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानावरून डॉ. मोहन खेरडे म्हणाले, ग्रंथालयांचा विकास हेच उद्दिष्ट घेऊन मुकला कार्यरत आहे. ग्रंथपाल हे केवळ प्रशासक नाहीत, तर सेवा पुरवठादार असण्याबरोबर ते शिक्षक आणि संशोधकही आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना नव्या युगातील संधी आणि आव्हाने यांसाठी सक्षम करण्याची जबाबदारी ते निश्चितपणे पेलतील. ग्रंथालये आणि प्रभावी आणि उपयुक्त बनविण्याच्या कामी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने ग्रंथपालांनी विचारविमर्श करावा, असे आवाहन त्यांनी केले.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुकलाचे महासचिव डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. एस.डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, तर उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या झंझावातामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन डॉ.ज्योती जाधव यांनी केले.

07 MAR 2026
सकाळ

# 'भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य'

कोल्हापूर, ता. ६ : 'भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे', असा सूर व्यक्त झाला. शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वि. स. खांडेकर भवनात मराठी अधिविभागतर्फे 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावर परिसंवाद झाला. विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी, डॉ. गिरीष मोरे सहभागी झाले. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते. विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. गवळी म्हणाले, 'भारतात पूर्वी लेखनापेक्षा पाठांतरावर अधिक भर होता. त्यामुळे पाठांतर आणि उच्चारशास्त्र अधिक प्रमाण मानले जाई. प्रचलित पद्यपद्धतीला अनुसरून विसर्ग आणि दंड हीच विरामचिन्हे प्रचलित होती. मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली.'

डॉ. मोरे म्हणाले, 'बोलण्यातून विरामचिन्हे व्यक्त होतात, तर लेखनातून दृश्यरूपात प्रकट होतात. विरामचिन्हे म्हणजे शिस्तीची काटेकोर लेखनसंहिता होय. विरामचिन्हांमुळे वाक्याचा नेमका अर्थ स्पष्ट होऊन वाचन सुलभ होते.'

डॉ. शिंदे म्हणाले, 'बोलण्या-लिहिण्यात विरामचिन्हांच्या वापराअभावी अराजक निर्माण होऊ शकते. बा. सी. मर्ढेकर, विलास सारंग, र. कृ. जोशी यांच्या कवितांत विरामचिन्हांचा ठाशीव वापर दिसून येतो. विरामचिन्हे ही भाषेत वाहतूक नियंत्रण यंत्रणेप्रमाणे काम करतात.' यावेळी मृण्मयी पांचाळ या विद्यार्थिनीने मराठी भाषा गौरव गीत सादर केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

1e4894b4-8b72-47de-b045-f9e8f8581284_20260303211541202603040...

0 7 MAR 2026

नवराष्ट्र

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Paschim Maharashtra | 04 March 2026 | Page 4

# भाषिक घोटाळे; विरामचिन्हे अनिवार्य

## शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरवदिनी आयोजित परिसंवादात सूर

▶ कोल्हापूर, (श. प्र.) भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला. शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. यानिमित्ताने 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ.गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



## विरामचिन्हे ही आहेत अर्थनिर्णयाची साधना

यावेळी डॉ. अनिल गवळी, डॉ. गिरीष मोरे यांनी, विरामचिन्हांमुळे वाक्याचा नेमका अर्थ स्पष्ट होऊन वाचन सुलभ होते. अर्थस्पष्टतेसाठी वाचकाची दमछाक टाळण्यासाठी विरामचिन्हे आवश्यक आहेत. विरामचिन्हे ही अर्थनिर्णयाची साधना होत. सर्वच लेखकांनी त्यांचा वापर करावा, असे आवाहन केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मृण्मयी पांचाळ या विद्यार्थिनीने मराठी भाषा गौरव गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAR 2026
जनप्रवास

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित


## डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात ग्रंथपालनविषयक दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**जनप्रवास : कोल्हापूर**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी व्यक्तिगत आयुष्यातील काही उदाहरणे देत ग्रंथालयांचे महत्त्व



शिवाजी विद्यापीठात आयोजित ग्रंथपालनविषयक राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. मंचावर (डावीकडून) डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. धनंजय सुतार, डॉ. मोहन खेरडे, डॉ. विनय पाटील, डॉ. एस.ए.एन. इनामदार.

आपल्या भाषणात विषद केले. त्या म्हणाल्या, एक शिक्षक आणि संशोधक म्हणून आयुष्याला ग्रंथांनी खरा आकार दिला. ३६ वर्षांच्या संशोधकीय वाटचालीमध्ये ग्रंथालये आणि त्यांच्या ग्रंथपालांचे योगदान खूप मोलाचे ठरले आहे.

परिषदेचे संचालक डॉ. एस. ए. एन. इनामदार म्हणाले, जग आज एका ऐतिहासिक वळणावर उभे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या परिवर्तनाचे आपण साक्षीदार आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या वर्तमानावर मोठा प्रभाव टाकत आहे आणि भविष्याला आकार देण्यास सज्ज झाली आहे. ग्रंथालयांसाठी ती एक सक्षम संधी म्हणून सामोरी आली आहे. ग्रंथालयांनी नेहमीच तंत्रज्ञानातील बदल स्वीकारले आहेत. संगणकाच्या आगमनानंतर ग्रंथालयांचे ऑटोमेशन झाले. इंटरनेटमुळे ग्रंथालये डिजिटल प्रवेशद्वारे झाली. आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे स्वयंचलित कॅटलॉगिंग,मेटाडेटा निर्मिती आणि वर्गीकरण ही ग्रंथालयातील नियमित तांत्रिक कामे अधिक जलद आणि अचूक होतील.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहन खेरडे म्हणाले, ग्रंथालयांचा विकास हेच उद्दिष्ट घेऊन मुकला कार्यरत आहे. ग्रंथपाल हे केवळ प्रशासक नाहीत, तर सेवा पुरवठादार असण्याबरोबर ते शिक्षक आणि संशोधकही आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना नव्या युगातील संधी आणि आव्हाने यांसाठी सक्षम करण्याची जबाबदारी ते निश्चितपणे पेलतील.

सुरुवातीला ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आणि रोपास पाणी वाहून मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुकलाचे महासचिव डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. एस. डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, तर उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

### डॉ. विलास जाधव यांना 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार'

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते.

3/7/26, 12:41 PM

IMG-20260307-WA0003.jpg

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 MAR 2026

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

# सिंधुदुर्ग समाचार

ऐकत रहा FM 90.4

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR 170 2024-2026 • किंमत १ •
कोल्हापूर
Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR 170 2024-2026
संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम
RNI NO : MAHMAR/2006/17335

• शनिवार दि.७ मार्च २०२६ • पाने ४ • वर्ष ३६ • अंक ०१४ • कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द • e-mail: klpsindhu@gmail.com • RNI NO : MAHMAR/2006/17335

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित : डॉ.ज्योती जाधव

## शिवाजी विद्यापीठात ग्रंथपालनविषयक दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ




कोल्हापूर/प्रतिनिधी :

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. मुकला संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे अध्यक्षस्थानी होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी व्यक्तीगत आयुष्यातील काही उदाहरणे देत ग्रंथालयांचे महत्त्व आपल्या भाषणात विषद केले. त्या म्हणाल्या, एक शिक्षक आणि संशोधक म्हणून आयुष्याला ग्रंथांनी खरा आकार दिला. ३६ वर्षांच्या संशोधकीय वाटचालीमध्ये ग्रंथालये आणि त्यांच्या ग्रंथपालांचे योगदान खूप मोलाचे ठरले आहे. ग्रंथालये ही ज्ञानाचे वाहक आणि प्रज्ञेचे निर्माते आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही या मूळ स्रोतांचे महत्त्व अबाधित राहणार आहे. कारण वस्तुनिष्ठ माहितीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही अंतिमतः ग्रंथांवरच अवलंबून राहावे लागणार आहे. या युगात वाढलेल्या नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ग्रंथालयांकडे आकर्षित करण्याचे आव्हान निश्चितपणे ग्रंथपालांसमोर उभे असून त्यामध्ये ते नक्की यशस्वी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिषदेचे संचालक डॉ. एस.ए.एन. इनामदार म्हणाले, जग आज एका ऐतिहासिक वळणावर उभे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या परिवर्तनाचे आपण साक्षीदार आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या वर्तमानावर मोठा प्रभाव टाकत आहे आणि भविष्याला आकार देण्यास सज्ज झाली आहे. ग्रंथालयांसाठी ती एक सक्षम संधी म्हणून सामोरी आली आहे. ग्रंथालयांनी नेहमीच तंत्रज्ञानातील बदल स्वीकारले आहेत. संगणकाच्या आगमनानंतर ग्रंथालयांचे ऑटोमेशन झाले. इंटरनेटमुळे ग्रंथालये डिजिटल प्रवेशद्वारे बनली. आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे स्वयंचलित कॅटलॉगिंग, मेटाडेटा निर्मिती आणि वर्गीकरण ही ग्रंथालयातील नियमित तांत्रिक कामे अधिक जलद आणि अचूक होतील. एआय-आधारित चॅटबॉट विद्यार्थ्यांना, संशोधकांना २४ तास संदर्भ आणि रेफरल सेवा देऊ शकते. मशीन लर्निंग अल्गोरिदम वर्तन आणि शैक्षणिक ट्रेंडच्या वापराचे विश्लेषण करून ग्रंथपालाला संग्रह विकासात मदत करू शकते. तथापि, तंत्रज्ञान डेटा प्रक्रिया करू शकते, परंतु मानवी बुद्धिमत्तेची, ज्ञानाची जागा घेऊ शकत नाही. भविष्यातील ग्रंथपाल केवळ पुस्तके आणि डेटाबेस व्यवस्थापित करणार नाही तर डेटा ग्रंथपाल आणि माहिती साक्षरता शिक्षक, संशोधन डेटा व्यवस्थापक, डिजिटल ज्ञान निर्माता आणि माहितीमध्ये नैतिक मार्गदर्शन करेल. आणि हे परिवर्तन साध्य करण्यासाठी, ग्रंथपालांना नवीन क्षमता आत्मसात करावी लागेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहन खेरडे म्हणाले, ग्रंथालयांचा विकास हेच उद्दिष्ट घेऊन मुकला कार्यरत आहे. ग्रंथपाल हे केवळ प्रशासक नाहीत, तर सेवा पुरवठादार असण्याबरोबर ते शिक्षक आणि संशोधकही आहेत. त्यामुळे ग्रंथालयांना नव्या युगातील संधी आणि आव्हाने यांसाठी सक्षम करण्याची जबाबदारी ते निश्चितपणे पेलतील. ग्रंथालये आणि प्रभावी आणि उपयुक्त बनविण्याच्या कामी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने ग्रंथपालांनी विचारविमर्श करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या महर्षी धोंडो केशव कर्वे ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. विलास जाधव यांना यंदाचा 'मुकला सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते.

सुरवातीला ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आणि रोपास पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिनकुमार पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुकलाचे महासचिव डॉ. विनय पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. सौ. एस.डी. हजारे आणि अमृता देसाई यांनी सूत्रसंचालन केले, तर उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी आभार मानले.

0 7 MAR 2026

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात चित्रकला कार्यशाळेप्रसंगी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई, प्रा. अभिजित कांबळे, बबन माने आणि विजय उपाध्ये यांच्यासमवेत सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी.

# पोर्ट्रेट, लँडस्केप चित्रकलेबाबत शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दोनदिवसीय चित्रकला कार्यशाळा झाली. 'पोर्ट्रेट, लँडस्केप अँड कॉम्पोझिशन' असा विषय होता. दळवीज आर्टस् इन्स्टिट्यूटचे प्रा. अभिजित कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे प्रात्यक्षिकांसह सांगितले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग सभागृह आणि परिसरात कार्यशाळा झाली. विद्यार्थ्यांना पोर्ट्रेट, लँडस्केप तसेच चित्ररचनेतील संतुलन, रंगसंगती आणि मांडणीबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची चित्रे साकारली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या भिंतीवर चित्रकला पदविकेच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी साकारलेली भित्तीचित्रे पाहून



रसिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

चित्रप्रदर्शन आयोजित केले. यात पोर्ट्रेट, निसर्गचित्रे आणि विविध संकल्पनांवर आधारित चित्रांचा समावेश होता. अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली बबन माने, विजय उपाध्ये यांनी समन्वयन केले. यावेळी प्राचार्य अजेय दळवी, डॉ. मानसिंग टाकळे, चित्रकार विजय टिपुगडे, संग्राम भालकर, सुदर्शन वंडकर, गजानन वाघमारे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAR 2026
सकाळ

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही वाचन, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित : डॉ. जाधव

## विद्यापीठात ग्रंथपालनविषयक राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ



कोल्हापूर : डॉ. विलास जाधव यांना सर्वोत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्रदान करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. यावेळी उपस्थित डावीकडून धनंजय सुतार, मोहन खेरडे, विनय पाटील, प्रकाश बिलावर, एस. ए. एन. इनामदार आदी.

कोल्हापूर, ता. ६ : 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्येही वाचनाचे, ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित राहणार असून, कोणतेही तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय ठरणार नाही. वस्तुनिष्ठ माहितीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही अंतिमतः ग्रंथांवरच अवलंबून राहावे लागणार आहे. नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ग्रंथालयांकडे आकर्षित करण्याचे आव्हान ग्रंथपालांसमोर असून त्यामध्ये ते नक्की यशस्वी होतील', असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी आज येथे व्यक्त केला.

महाराष्ट्र विद्यापीठे आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल (मुकला) संघटना, शिवाजी विद्यापीठ शाखा, विद्यापीठाचे बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रंथपालन व्यवसायाचे भवितव्य' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‍घाटक म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी 'मुकला' संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे होते. डॉ. एस. ए. एन. इनामदार म्हणाले, 'भविष्यातील ग्रंथपाल केवळ पुस्तके आणि डेटाबेस व्यवस्थापित करणार नाही, तर डेटा ग्रंथपाल आणि माहिती साक्षरता शिक्षक, संशोधन डेटा व्यवस्थापक, डिजिटल ज्ञान निर्माता आणि माहितीमध्ये नैतिक मार्गदर्शन करेल.